महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज

Government Medical College, Miraj

Website: gmcmiraj.edu.in mail: deangmcmiraj@yahoo.co.in Phone: 0233/2232090-99 Fax: 0233-2231959

जा.क्र.शावैममि/शावैमरुमि/सहा.प्राध्या/रिक्त पदे/जाहिरात/ ११८८९-९९ /२२, दि. ०७ -११-२०२२.

## --जाहिरात -

विषय :- सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदे स्थानिक/विभागीय निवड मंडळामार्फत (डी.एस.बी.) थेट मुलाखतीव्दारे तात्पुरत्या स्वरुपात १२० दिवसांकरिता भरण्याबाबत..

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र.डीएसबी-१२०१/सीआर/२७६/२००१/वैसेवा-३, दि. १०-०८-२००१

२) एपिडेमिक ॲक्ट १८९७,

३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापना कायदा दि.२३ डिसेंबर, २००५

४) दिनांक ०४-११-२०२२ रोजीची मंजूर टिप्पणी.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मिरज आणि पदमभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली येथील सहाय्यक प्राध्यापक यांची खालील नमूद विषयातील रिक्तपदे संदर्भ १ ते ४ नुसार संस्थास्तरावर स्थानिक विभागीय निवड मंडळामार्फत थेट मुलाखतीव्दारे १२० दिवसांकरीता विहित पध्दतीने भरण्यासाठी संस्थेच्या संकेतस्थळावर खालील अटी व शर्तीच्या आधारे जाहिरात प्रसिध्द करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | विषय | रिक्त पदे | एकत्रित ठोक मानधन |
|---|---|---|---|---|
| | | **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज** | | |
| ०१ | सहाय्यक प्राध्यापक | शरीररचनाशास्त्र | ०२ | शासन निर्णय क्रमांक वेतनी-२०१९/प्र.क्र.०३/२०१९/वैसेवा-२, दि.३१ डिसेंबर, २०२० अन्वये नियुक्ती कालावधीत दरमहा एकत्रित ठोक मानधन रु.१ लाख इतके अनुज्ञेय राहील. |
| ०२ | | सूक्ष्मजीवशास्त्र | ०१ | |
| ०३ | | औषधशास्त्र | ०१ | |
| ०४ | | विकृतीशास्त्र | ०२ | |
| ०५ | | न्यायवैद्यकशास्त्र | ०२ | |
| ०६ | | जनऔषधवैद्यकशास्त्र | ०२ | |
| ०७ | | औषधवैद्यकशास्त्र | ०१ | |
| ०८ | | शल्यचिकित्साशास्त्र | ०३ | |
| ०९ | | स्त्रीरोग प्रसुती | ०२ | |
| १० | | प्रसुतीपुर्व वैद्यकीय अधिकारी नि अधिव्याख्याता | ०१ | |
| ११ | | क्ष-किरणशास्त्र | ०१ | |
| १२ | | बधिरिकरणशास्त्र | ०१ | |
| १३ | | कान,नाक व घसाशास्त्र | ०१ | |
| १४ | | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | ०१ | |
| १५ | | क्षयरोगशास्त्र | ०१ | |
| १६ | | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | ०१ | |
| १७ | | मनोविकृतीशास्त्र | ०२ | |
| | | **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय , मिरज** | | |
| ०१ | सहाय्यक प्राध्यापक | नेत्रशास्त्र | ०१ | शासन निर्णय क्रमांक वेतनी-२०१९/प्र.क्र.०३/२०१९/वैसेवा-२, दि.३१ डिसेंबर, २०२० अन्वये नियुक्ती कालावधीत दरमहा एकत्रित ठोक मानधन रु.१ लाख इतके अनुज्ञेय राहील. |
| ०२ | | क्षकिरणशास्त्र | ०१ | |
| ०३ | | शल्यचिकित्साशास्त्र | ०१ | |
| ०४ | | विकृतीशास्त्र | ०१ | |
| ०५ | | बधिरिकरणशास्त्र | ०१ | |
| ०६ | | औषधवैद्यकशास्त्र | ०१ | |
| | | **पदमभुषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगली** | | |
| ०१ | सहाय्यक प्राध्यापक | औषधवैद्यकशास्त्र (I.C.U) | ०१ | शासन निर्णय क्रमांक वेतनी-२०१९/प्र.क्र.०३/२०१९/वैसेवा-२, दि.३१ डिसेंबर, २०२० अन्वये नियुक्ती कालावधीत दरमहा एकत्रित ठोक मानधन रु.१ लाख इतके अनुज्ञेय राहील. |

Scanned with CamScanner

## अटी व शर्ती -

१) प्रचलीत शासन नियमानुसार गुणवत्तेनुसार त्या त्या विषयात धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती आदेश देण्यात येतील.

२) जाहिरातीमधील नमूद पदावर नॉन कोविड रुग्णसंख्या वाढत असल्याने तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आली आहे अश्या कार्यरत असलेल्या उमेदवारांनीही थेट मुलाखतीमध्ये आपल्या शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेल्या सर्व कागदपत्रासह उपस्थित राहणे बंधनकारक आहे. अन्यथा उपस्थित न राहील्यास आपली नियुक्ती, अन्य उमेदवाराला नियुक्ती देण्यात आल्याने समाप्त झाली असे समजण्यात येईल.

३) सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी त्यांच्या पदासमोर दर्शविलेल्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार एकत्रित ठोक मानधन लागू राहील.

४) वरील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात **दिनांक १४ /११/२०२२ रोजी दुपारी ०३-०० वाजतां थेट मुलाखतीव्दारे** भरण्यांत येणार आहेत. याबाबत या संस्थेच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यांत येत आहे. इच्छुक व पात्र असलेल्या उमेदवारांनी **(कार्यालयातून विहित नमुन्यातील अर्ज घेऊन तो भरुन कार्यालयास सादर करावा)** तसेच आवश्यक त्या सर्व शैक्षणिक कागदपत्रांसह थेट मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे तसेच जे उमेदवार अन्य शासकीय अथवा निमशासकीय / खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत आहेत त्यांनी संबंधित संस्थेकडून ना-हरकत प्रमाणपत्र व नियुक्ती आदेशाच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

५) **संचालनालयाच्या संदर्भीय पत्रानुसार उपरोक्त रिक्त जागांवर बंधपत्रित उमेदवारांना प्रथम प्राधान्य् देण्यांत येईल. संबधित विषयात बंधपत्रित उमेदवार उपलब्ध न झाल्यास अबंधपत्रित उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.**

६) सध्या तात्पुरत्या स्वरुपात थेट नियुक्तीव्दारे कार्यरत असलेल्या सहाय्यक प्राध्यापक, यांनी संबंधित प्राध्यापक व विभाग प्रमुख यांच्या मार्फत अर्ज भरुन मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

अ) <u>सहाययक प्राध्यापक पदासाठी शैक्षणिक अर्हता :-</u>

१) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी (एम.डी./एम.एस.).

२) भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या शैक्षणिक अर्हता.

३) **सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली यांच्या निकषानुसार वरिष्ठ निवासी या पदाचा ०१ वर्षाचा अनुभव/ प्रमाणपत्र असणे गरजेचे आहे.**

ब) <u>सहाययक प्राध्यापक या पदासाठीचे निकष व क्रम खालीलप्रमाणे राहतील.</u>

१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज येथून उत्तीर्ण झालेले पदव्युत्तर पदवी अर्हता धारक

२) महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेले पदव्युत्तर पदवी अर्हता धारक (महानगर पालीकेच्या महाविद्यालयांसह).

३) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथून उत्तीर्ण झालेले पदव्युत्तर पदवी अर्हता धारक.

४) इतर अभिमत विद्यापीठातून उत्तीर्ण झालेले पदव्युत्तर पदवी अर्हता धारक.

५) बंधपत्रित उमेदवारांना प्राध्यान्य् देण्यात येईल.

६) या रुग्णालयात कोविड-१९ आपत्कालीन परिस्थतीच्या अनुषंगाने सेवा बजावलेल्या उमेदवारांस/वरीष्ठ निवासी यांना प्राध्यान्य देण्यांत येईल.

<u>वयोमर्यादा :- खुल्या प्रवर्गासाठी ४० वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४५ वर्ष</u>

<u>टिप :- १) ज्या उमेदवारांना संचालनालयाकडून मध्यवर्ती निवड प्रक्रियेव्दारे यापुर्वी सहाय्यक प्राध्यापक, या पदांकरीता शिफारस/ निवड करण्यात आली आहे, असे उमेदवार या मुलाखतीस पात्र राहणार नाहीत.</u>

<u>२) निवड प्राप्त उमेदवारांना आपत्कालीन परिस्थितीच्या अनुषंगाने लावण्यांत येणाऱ्या डयूटी करणे बंधनकारक राहील.</u>

पान ३ वर...

Scanned with CamScanner

वरील नमूद पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे. मुलाखत दिनांक: १४ /११/२०२२ रोजी दुपारी ०३-०० वाजतां अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथील महाविद्यालयीन परिषद सभागृहात होईल. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविले जाणार नाही याची संबंधितानी नोंद घ्यावी तसेच ज्या उमेदवारांनी या जाहिरातीपुर्वी वरील पदांसाठी अर्ज सादर केलेले असतील अथवा सदर पदावर तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असतील, त्यांनी सदर जाहिरातीनुसार पुनश्च अर्ज सादर करणे/ थेट मुलाखतील उपस्थित राहणे अनिवार्य आहे. रिक्त पदांची संख्या कमी अथवा जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदरच्या मुलाखतीच्या दिनांकात बदल करणे अथवा सदरची भरती प्रक्रिया रदद करणे याबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठातांनी राखून ठेवले आहेत.

GOVT. MEDICAL COLLEGE MIRAJ

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,मिरज,
पदमभुषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगली

प्रति,

१) उपरोक्त सर्व विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज.
२) वैद्यकीय अधिक्षक, शावैमरुमिरज/पवपाशारुसांगली .
३) सूचना फलक, विद्यार्थी वसतिगह,बाहयरुग्ण् विभाग,मिरज-सांगली/अधिष्ठाता कार्यालय/ग्रंथालय, शावैममिरज/शावैमरुमिरज/ पवपाशारुसांगली
४) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/मुंबई,पुणे,सोलापूर,कोल्हापूर,अंबाजोगाई,लातूर, नांदेड,अकोला,यवतमाळ,नागपूर,धुळे,औरंगाबाद,चंद्रपूर,गोंदिया,जळगांव, बारामती.

प्रत : माहितीसाठी सविनय सादर

१) मा.सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय , गो.ते.रुग्णालय संकुल, ९ वा मजला, मुंबई
२) मा.आयुक्त् (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई-१.
३) मा.संचालक,वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई-१.

Scanned with CamScanner